जळगाव- दि. २४ (प्रतिनिधी) इमारतीला आग लागल्यावर अथवा इमारत कोसळल्यावर उदभवलेल्या आपत्तीच्या काळात समयसुचकता दाखवित इमारतीमधील नागरिकांना दोरखंडाव्दारे बाहेर काढण्याचे एनडीआरएफच्या प्रशिक्षकांनी दाखविली प्रात्याक्षिके पाहून बघणा-यांचा क्षणभर श्वास रोखला गेला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर सुरू असून आज सहाव्या दिवशी दोरीव्दारे बचावाची प्रात्याक्षिके  लक्षवेधी ठरली. विशेष म्हणजे रासेयोच्या स्वयंसेवकानी या प्रात्याक्षिकांमध्ये एनडीआरएफच्या प्रशिक्षकांसोबत उत्साहाने भाग घेतला यामध्ये विद्यार्थिनी देखील आघाडीवर होत्या. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये ही चित्तथरारक प्रात्याक्षिके दाखविण्यात आली. उंच इमारतीमध्ये अशी आपत्ती उदभवल्यावर परिस्थितीचा अंदाज घेत दोरखंडाव्दारे कोणत्या प्रकारचे बचाव तंत्र वापरायचे याचा अंदाज घ्यायचा असतो. जिवीतहानी होणार नाही याकडे अधिक लक्ष देत बचावतंत्राची वेगवेगळे प्रात्याक्षिके यावेळी सादर करण्यात आली. टायगर लिफ्ट, एअर लिफ्ट, कॅटवॉक, लाँग सिलींग, सिट रॅपलिंग, फ्रँन्ट रॅपलिंग, शोल्डर रॅपलिंग असे अनेक प्रकार यावेळी दाखवण्यात आले. यामध्ये इमारतीमधून नागरिकांना कशा पध्दतीने खाली आणले जाते अथवा एखादा व्यक्ति बेशुध्द असेल तर स्ट्रेचरवर दोरखंडाव्दारे कसे आणले जाते. याशिवाय पाठीवर, बाहूपाशात दूर्घटनाग्रस्त व्यक्तीला आणण्याची प्रात्याक्षिके दाखविण्यात आली. यावेळी दोरखंडाचा अँगल कसा असावा हेदेखील सांगण्यात आले. व्यक्ती घाबरलेली असेल तर पाठीवर तिला कसे आणता येते याची चित्तथरारक प्रात्याक्षिके पाहून रासेयो स्वयंसेवक व बघणारे सगळेच क्षणभर शहारले. जिवावर उदार होत आपत्तीच्या काळात एनडीआरएफचे जवान बचाव कार्यात कसे अग्रेसर राहतात हे पाहून अनेकांनी एनडीआरएफच्या कार्याला सॅल्यूट केला.

आग लागल्यानंतर अग्निशमन उपकरणांनी ही आग कशी विझवायची याची देखील प्रात्याक्षिके दाखविण्यात आली. दोरीच्या गाठीचे प्रकार त्यामध्ये रीफ गाठ, संधी गाठ, चोर गाठ, साधी गाठ, शिडी गाठ, जिवरक्षक गाठ आदी गाठींचे प्रकार सांगण्यात आले. दोरखंड हाताळतांना हातांची हालचाल कशी असावी, बचाव कार्यासाठी दोरीचा वापर कसा करावा याची माहिति रासेयो स्वयंसेवकांना देण्यात आली. अनंता बाभूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश जाधव, वैभव शेडोळे, सुशिल अस्वले, श्याम फाफले, सागर चव्हाण यांनी ही प्रात्याक्षिके सादर केली. विद्यापीठात सुरू असलेल्या या दहा दिवसीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरासाठी जळगावच्या रेडक्रॉसने दहा दिवसासाठी ॲब्युलन्स सेवा आणि सामान्य रूग्णालयाने ॲब्युलन्स व वैद्यकीय पथकाची सेवा निशुल्क उपलब्ध करून दिली आहे.

आज झालेल्या प्रात्याक्षिकांच्यावेळी निरीक्षक डॉ. प्रमोद पाबरेकर, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे, आव्हानचे समन्वयक प्रा. किशोर पवार आदी उपस्थित होते. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात रायगड, नाशिक, सांगली, उस्मानाबाद, धुळे, लातूर, वाशी, रामटेक येथील विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

---------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी